## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)
## (०२३५८) २८२३८७

**अंक १६/२०१९** **दिनांक २२/०२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०२/२०१९ ते २२/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/०२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/०२ | १७/०२ | १८/०२ | १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | | २३/०२ | २४/०२ | २५/०२ | २६/०२ | २७/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.६ | ३४.२ | ३४.८ | ३६.८ | ३६. ५ | ३९.५ | - | कमाल तापमान (अं.से) | २८ | २९ | २८ | २८ | २७ |
| १२.० | १२.६ | १३.८ | १३.६ | १५.४ | १८.५ | - | किमान तापमान (अं.से) | २१ | २२ | २१ | २० | १८ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | १ | १ | ३ |
| ८९ | ८१ | ७८ | ७६ | ८८ | ९२ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५९ | ५० | ५८ | ६२ | ६२ |
| १५ | १५ | १६ | २३ | १९ | २८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४८ | ४२ | ३९ | ३८ | ५० |
| ३.४ | ३.० | ३.६ | ४.६ | २.७ | ४.७ | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | ११ | ९ | ६ | ८ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | नै.द. | ई.पू. | नै.द. | उ. | आ.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २३ ते २७ फेब्रुवारी २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेगात वाढ संभवते.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | फुटवे अवस्था | • उन्हाळी भात पिकातील तणाचे व्यवस्थापन करावे तसेच पिकास नत्राचा दुसरा हप्ता फुटवे येण्याच्या वेळी (पुनर्लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी) हेक्टरी ४० कि.ग्रॅ. नत्र (८७ कि.ग्रॅ. युरिया प्रती हे.) देण्यात यावा.<br>• भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. ठेवावी |
| भुईमुग | फुलोरा व आऱ्या | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. |
| वाल | काढणी अवस्था | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था | • तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नारळावरील सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात तसेच खोडावर १ मीटर उंचीवर गिरमीटाच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के मोनोक्रोटोफॉस प्रवाही कीटकनाशक नरसाळ्याच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | काढणी अवस्था | • वेलवर्गीय भाजीपाला पिकावर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने माशीच्या नियंत्रणासाठी शेतात “रक्षक” सापळा प्रति हेक्टरी ४ नग या प्रमाणात लावावेत.<br>• उन्हाळी हंगामात भेंडीची लागवड ४५ x १५ से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५ टन शेणखत, ७२ किलो युरिया, ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ८३ किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रती हेक्टरी खताची मात्र द्यावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• काजू पिकाची मृदकाष्ठ पद्धतीने कलमे करण्यासाठी खुंट म्हणून वापरण्यात येणाऱ्या रोपांसाठी काजू बियांची पिशवी मध्ये रुजवणी करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रती दिन द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३०० ग्रॅम खुराक, ३ ते ४ किलो हिरवी वैरण व २ ते २.५ किलो वाळलेली वैरण प्रती दिन द्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**